आतंरजिल्हा बदलीने नेमणुक देणेबाबत
श्री. सचिन भास्कर शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी,
पंचायत समिती जुन्नर जिल्हा परिषद पुणे.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२

वाचा :- १. महाराष्ट्र शासन जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८)

२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.जिपब-७११/प्र.क्र.११३/११ आस्था-१४ दि.२९ सप्टेबर २०११

३. ग्रामविकास व जलसंधारण विभाग महा.शासन मुंबई यांचेकडील शासन शुद्धीपत्रक क्र.न्यायप्र-०५१२/प्र.क्र.११८/१२ आस्था-१४ दि.१८ ऑक्टो.२०१२

५. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.पुणे यांचेकडील प्रस्ताव क्रमांक जिप/पंचा/आस्था-१/१०८६/२०२५ दि.०७/०८/२०२५

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८) च्या तरतुदीस अधिन राहुन ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील संदर्भीय परिपत्रक क्र. २ नुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर खालील ग्रामपंचायत अधिकारी यांना त्यांच्या नावापुढे रकाना क्र ६ मध्ये नमुद केलेप्रमाणे आंतरजिल्हा बदलीने खालील अटी व शर्तीचे अधिन राहुन सामावुन घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | सध्याचे कार्यरत ठिकाण | | नेमणुक प्रवर्ग | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| | | जिल्हा परिषद | पंचायत समिती | | पंचायत समिती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. सचिन भास्कर शिंदे | पुणे | जुन्नर | खुला | अहिल्यानगर |

अटी व शर्ती –

१. अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडे सेवेत असलेल्या ग्रामपंचायत अधिकारी यांचे जेष्ठता यादीत त्यांची सेवाजेष्ठता ते ज्या तारखेपासुन जिल्हा परिषद अहिल्यानगरकडे सेवेत हजर होतील त्या तारखेपासुन कनिष्ठतम धरणेत येईल.
२. अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या आंतरजिल्हा बदलीबाबतच्या अटी व शर्ती असतील त्या त्यांना बंधनकारक राहतील.
३. सध्याचे कार्यरत जिल्हा परिषदेकडे जी वेतनश्रेणी देय आहे त्याच वेतनश्रेणीमध्ये जिल्हा परिषद अहिल्यानगर कडे आंतरज़िल्हा बदलीने सामावुन घेणेत येत आहे.
४. त्यांना दिलेली नेमणुक त्यांच्या विनंतीवरुन असल्याने त्यांना वाटचाल व प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
५. नेमणुकीबाबत व सेवाशर्तीबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश त्यांना बंधनकारक राहतील.

६. शासनाने जिल्हा परिषद सेवकास विहित केलेली जिल्हा सेवा प्रवेशोत्तर परिक्षा नोकरीस लागल्यापासुन चार वर्षाचे आत तीन संधीमध्ये यशस्वीरित्या उत्तीर्ण न केल्यास होणा-या संभाव्य कारवाईस पात्र राहतील.

७. आंतर जिल्हा बदलीने हजर झालेनंतर संबंधित कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी/डीसीपीएस खाते व खात्यावरील रक्कम ६ महिन्याच्या आत जिल्हा परिषद अहिल्यानगरकडे वर्ग करणेची जबाबदारी संबंधित कर्मचारी व कार्यमुक्त करणाऱ्या जिल्हा परिषदेची राहिल. सदर बाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्यास जिल्हा परिषद अहिल्यानगर जबाबदार राहणार नाही.

८. आंतर जिल्हा बदलीने अहिल्यानगर जिल्हा परिषदेकडे सामावुन घेणे कामी संमतीपत्र तसेच पदस्थापना आदेशाच्या दिनांकापासुन संबंधित कर्मचारी यांना पदस्थापनेच्या ठिकाणी ६ महिन्याच्या आत हजर होणे बंधनकारक राहिल. त्यानंतर सदरचा आदेश आपोआप रद्द समजणेत येईल याची नोंद घ्यावी.

९. जिल्हा परिषदेची नोकरी सोडण्याची झाल्यास एक महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202510210601 48 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 21-10-2025 14:08:00
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति - श्री. सचिन भास्कर शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती जुन्नर, जिल्हा परिषद पुणे.

प्रतिलिपी - योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी व माहीतीसाठी.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद पुणे / अहिल्यानगर
३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद पुणे / अहिल्यानगर
४. गटविकास अधिकारी, पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे
५. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर, जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरीत/-
(आनंद भंडारी भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर